# आदिवासी मुली बोलणार परदेशी भाषा

## येऊर अनाथाश्रमातील मुलींसाठी क्रायसिस फाऊंडेशनचा उपक्रम

**ठाणे : वार्ताहर**

संगणकाबरोबर आता परदेशी भाषादेखील आदिवासी मुलींकडून बोलीभाषेबरोबरच जर्मन व अरेबिक भाषा ऐकायला मिळणार आहे. ही किमया घडत आहे ती येऊर येथील अनाथाश्रम येथे! क्रायसिस फाऊंडेशनच्या वतीने येऊर येथील अनाथाश्रमात आदीवासी मुलींना संगणकाच्या प्रशिक्षणाबरोबर जर्मन व अरेबिक या दोन भाषांचे धडे दिले जात आहे. येत्या महिन्याभरात या मुली अरेबिक आणि जर्मन या दोन परदेशी भाषा बोलू लागतील.



आदिवासी मुली हळूहळू शिक्षण घेऊ लागल्या आहेत. परंतु त्या जेव्हा नोकरी शोधायला जातात तेव्हा त्यांच्या पदरी निराशा येते. त्यामुळे अशा मुलींसाठी क्रायसिस फाऊंडेशनच्या वतीने एक आगळावेगळा उपक्रम राबविला जात आहे. संस्थेने वाडा, डहाणू, जव्हार या ठिकाणी प्रगती प्रतिष्ठानच्या सहकार्याने सर्व्हेक्षण केले आणि त्यातून १० मुलींची निवड केली. दिवसातले सहा तास प्रशिक्षणाबरोबर त्यांच्याकडून कामदेखील करून घेतले जाते. त्या कामाचा योग्य तो मोबदलाही देण्यात येतो. बाहेरील देशांतून त्यांच्या भाषेत येणारी कामे या मुलींना समजावी म्हणून त्यांना २६ जानेवारीपासून सध्या अरेबिक आणि जर्मन या भाषा शिकविल्या जात असल्याचे संस्थेच्या अपुर्वा आगवण यांनी पुढारीशी बोलताना सांगितले. बार्बरा बिंडन या त्यांना या दोन्ही भाषा शिकवत आहेत.